## सत्र खटला क्र. १० / २०२६ मधील नि.क्र. ३८ खालील आदेश
## ( आदेश पारीत दिनांक १३ ऑगस्ट २०२६ )

**१ )** आरोपी क्र. १ सय्यद सलमान सय्यद जमीर, २) सय्यद आसीफ सय्यद मंजुर व ३) सय्यद इमरान सय्यद रहीम यांनी प्रस्तुत अर्ज हा भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम ४८३ अन्वये डोणगांव पोलीस स्टेशनमध्ये भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१), १०९ (१), १८९ (२), १८९ (४), १९१ (२), १९१ (३), १९०, २९६, ३५१ (२) अन्वये नोंदविण्यात आलेल्या गुन्हा क्र. २९५ / २०२५ संदर्भात नियमित जामीन मिळणेसाठी दाखल केला आहे. संक्षिप्ततेकरिता सदर तिन्ही आरोपींचा यापुढे आवश्यकतेनुसार हया आदेशाच्या यापुढील भागात ''आरोपी, आरोपींनी, आरोपींचा, सदर आरोपी'' असा उल्लेख करण्यात येत आहे.

**२)** फिर्यादी विकार खॉंन जाबीर खॉंन, रा. मंगरुळ नवघरे, ता. चिखली, जि. बुलडाणा यांनी दाखल केलेल्या प्रथम खबरी अहवालावरुन वर उल्लेखिलेला गुन्हा क्र. २९५ / २०२५ हा आरोपींविरुध्द दिनांक १०.११.२०२५ रोजी डोणगांव पोलीस स्टेशन येथे नोंदविण्यात आला आहे.

**३)** अभियोग पक्षाच्या कथनानुसार दिनांक १०.११.२०२५ रोजी फिर्यादी विकार खाँ जाबीर खॉ पठाण व त्याचे नातेवाईक हे त्यांचे अंजनी बुद्रुक शिवारातील शेता मध्ये हळदीच्या पिकात निंदन करण्यासाठी गेले होते. सदर दिवशी दुपारी ०३.३० वाजेच्या सुमारास आरोपी सैय्यद मंजुर सैय्यद बिराम व त्याचे साथीदार आरोपी सैय्यद समीर सैय्यद बशीर, सैय्यद सलमान सैय्यद जमीर, सैय्यद आसिफ सैय्यद मंजुर, सैय्यद रफिक सैय्यद मुनाफ, सैय्यद रहीम सैय्यद बिराम, सैय्यद इमरान सैय्यद रहीम, आरेफाबी सय्यद मंजुर, फरीदाबी सय्यद जमीर आणि सुलतानाबी सैय्यद रहीम हे लोखंडी रॉड व लाकडी काठ्या घेवुन आले. आरोपींनी फिर्यादीला तसेच त्याचे आई-वडिलांना आणि नातेवाईकांना

शिवीगाळ करून धमकी दिली व त्यांना लोखंडी रॉड व काठ्यांनी मारहाण करुन गंभीर जखमी केले. आरोपी सैय्यद समीर सैय्यद बशीर, आरोपी सैय्यद मंजुर सैय्यद बिराम आणि त्यांचे साथीदारांनी फिर्यादीच्या फुफाचे डोक्यावर लोखंडी रॉडने अनेकवेळा प्रहार करुन त्यांना गंभीर जखमी केले. आरोपींनी फिर्यादीचे फुफा सैय्यद अयाज सैय्यद वाहेद यांना मारहाण करुन त्यांची हत्या केली. आशा अशयाच्या फिर्यादीच्या आधारे आरोपींविरुध्द गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे.

**४)** आरोपींनी असे कथन केले आहे की, त्याच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) खालील अपराध प्रथम दर्शनी निष्पन्न होत नाही. अभियोग पक्षाच्या साक्षीदारांच्या जबाबामध्ये घटनेची वेगवेगळी दोन ठिकाणे सांगण्यात आली आहे. यावरुन प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब अविश्वसनिय आहेत. न्यायालयाने प्रस्तुत गुन्ह्यातील सह आरोपी आरीफाबी व इतर दोन आरोपींना जामीनावर मुक्त केले आहे. अभियोग पक्षाच्या प्रत्यक्षदर्शी साक्षादारांचे भारतीय न्याय सुरक्षा संहिता कलम १८३ अन्वये नोंदविण्यात आलेले आहेत. त्यांच्या जबाबामध्ये असलेल्या विसंगतीचा फायदा आरोपींना देवुन त्यांना जामिनावर मुक्त करण्यात येवु शकते.

**५)** आरोपींनी पुढे असे कथन केले आहे की, त्यांच्याविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०९ अंतर्गत शिक्षेस पात्र असलेल्या अपराधासाठी सकृतदर्शनी खटला असल्याचे निष्पन्न होत नाही. आरोपींचा मयताचा खुन करण्याचा कोणताही हेतु अथवा उद्देश नव्हता ही बाब साक्षीदारांच्या जबाबावरुन स्पष्ट होते. मयत व्यक्तीला झालेल्या दुखापती हया मृत्यु होण्यास पुरेशा होत्या हे दर्शविणारे डॉक्टरांचे कोणतेही मत प्रस्तुत प्रकरणात सादर केलेले नाही. जखमी साक्षीदाराला रुग्णालयातुन सोडुन देण्यात आले असल्यामुळे आरोपींविरुध्द सदर गुन्ह्यामध्ये वाढ होण्याची कोणतीही शक्यता नाही. आरोपीं पैकी सय्यद इमरान सय्यद रहिम याने फिर्यादी विकार खॉन व इतर ८ जणांविरुध्द

भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), १८९ (२), १८९ (४), १९१ (२),१९३ (३), १९६, ३५२ अन्वये प्रती तक्रार दाखल केली व त्याआधारे फिर्यादी व इतरांविरुध्द गुन्हा २९६ / २०२५ हा दाखल करण्यात आला आहे. सदरहु गुन्ह्यामध्ये आरोपी व्यक्तिंना दुखापत झालेली आहे. परंतु त्यासंदर्भात अभियोग पक्षाने कोणतेही योग्य ते स्पष्टीकरण दिलेले नाही. प्रस्तुत प्रकरणात आरोपींविरुध्द दोषारोप निश्चीत करण्यात आलेले आहेत. त्यामुळे आरोपींना न्यायालयीन कोठडीमध्ये ठेवण्याची आवश्यकता नाही. आरोपी हे न्यायालयाकडुन ज्या अटी व शर्ती लादल्या जातील त्या सर्वांचे पालन करण्यास तयार आहे. शेवटी आरोपींनी जामीन मंजुर करण्याची विनंती केली आहे.

**६)** याउलट अभियोग पक्षाने निशाणी क्र. ४१ वर म्हणणे दाखल करुन त्याद्वारे आरोपींचा जामीन अर्ज रद्द करण्याची मागणी केली आहे. अभियोग पक्षाच्या वतीने असे निवेदन करण्यात आले की, फिर्यादी, मृतक, साक्षीदार व आरोपींमध्ये शेतीच्या कारणांवरुन वाद झाला होता व त्यामध्ये आरोपींनी सय्यद आयाज सय्यद वाहेद यांना गंभीर जखमी करुन त्यांचा खुन केला असे फिर्यादी व जखमी साक्षीदारांच्या जबाबावरुन स्पष्ट होत आहे. आरोपी हे घटनास्थळी हजर होते. फिर्यादी, मृतक, जखमी व आरोपी हे एकमेकांचे नातेवाईक असुन त्यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद आहेत. फिर्यादी व आरोपींच्या जमिनी शेजारी आहेत. जर आरोपी जामीनावर सुटल्यास पुन्हा त्याच कारणावरुन फिर्यादी व त्यांच्यामध्ये अशा स्वरुपाची घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. आरोपींच्या हातामध्ये गुन्ह्यात वापरलेले हत्यार लोखंडी रॉड, पाईप व लाकडी काठ्या या घटनास्थळावरुन जप्त करण्यात आल्या आहेत. यावरुन आरोपींनी देखील गुन्ह्यात हत्याराचा वापर केल्याचे दिसुन येते. आरोपींनी जखमी महिला रिजवान बी, शबाना बी, राईसा बी शेख व रिहानाबी सय्यद यांना लोखंडी रॉड व काठ्यांनी मारहाण करुन त्यांना गभीररित्या जखमी केले आहे. शेवटी अभियोग पक्षाच्या वतीने आरोपींचा जामीन अर्ज फेटाळण्याची विनंती करण्यात आली.

**७)** आरोपींचे विद्यमान विधिज्ञ श्री. ए. आर. शेख यांचा पहिला आणि मुख्य युक्तीवाद केला की, आरोपी व फिर्यादीमध्ये जमिनीवरुन वाद होते. आरोपींच्या वतीने सय्यद इमरान सय्यद रहिम याने फिर्यादी विकार खॉन व इतर ८ जणांविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम ११८ (१), १८९ (२), १८९ (४), १९१ (२),१९३ (३), १९६, ३५२ अन्वये प्रती तक्रार दाखल केली व त्याआधारे फिर्यादी व इतरांविरुध्द गुन्हा २९६ / २०२५ हा दाखल करण्यात आला आहे. सदरहु गुन्ह्यामध्ये आरोपी व्यक्तिंना दुखापत झालेली आहे. आरोपींचा मृतकाचा खुन करण्याचा कोणताही हेतु नव्हता. अशा परिस्थितीमध्ये आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) खालील अपराध प्रथमदर्शनी निष्पन्न होत नाही. याउलट विद्यमान शासकीय अभियोक्ता यांनी असा युक्तिवाद केला की, सर्व आरोपी हे एकाच वेळी हत्यारे व शस्त्रासह घटनास्थळी गेले होते व त्यावेळी त्यांनी संगणमत करुन मृतक व जखमी साक्षीदारांना जबर मारहाण केली होती. त्यामध्ये मृतक श्री. सय्यद अयाज सय्यद वाहेद हे मयत झाले. यावरुन आरोपींनी संगणमत करुन मृतक श्री. सय्यद अयाज सय्यद वाहेद यांच्या मृत्युस कारणीभुत झाले असल्याचे निष्पन्न होते.

**८)** आरोपी व अभियोग पक्षातर्फे करण्यात आलेल्या वरील युक्तिवादांच्या अनुषंगाने महत्वाची बाब नमुद करणे जरुरीची वाटते ती अशी की, मृतकाचा मृत्यु घडवुन आणण्याचा किंवा खुन करण्याचा आरोपींचा हेतु होता किंवा नाही हया बाबीसंबंधी अनेक परिस्थितींच्या एकत्रीत विचार मंथनातुन निष्कर्ष काढता येतो, जसे की, १) वापरलेल्या शस्त्राचे स्वरुप, २) शस्त्रांचा वार हा शरीराच्या अत्यंत नाजुक भागात केला आहे का ?, ३) आरोपींनी स्वतः शस्त्र आणले होते की घटनास्थळावरुन उचले होते, ४) दुखापत करण्यासाठी वापरलेल्या बळाचे प्रमाण, ५) घटना योगायोगाने घडली की त्यामागे काही पुर्वनियोजन होते, ६) पुर्वीचे काही वैर होते का किंवा मृत व्यक्ती आरोपींना अनोळखी होती, ७) घटनास्थळी काही गंभीर आणि अचानक प्रक्षोभ (राग) आणणारी परिस्थिती निर्माण

झाली होती का ? अणि तसे असल्यास अशा प्रक्षोभाचे कारण काय होते, ८) आरोपींचे कृत्य हे रागाच्या भरात झाले होते का ? ९) आरोपींनी मयतावर एकच वार केला की अनेक वार केले.

**९)** प्रस्तुत प्रकरणातील आरोपींचे घटनास्थळावरील कृत्य व कृतींचे वर नमुद केलेल्या परिस्थितींच्या पार्श्वभुमीवर परिक्षण केल्यास सदर आरोपींनी इतर सह आरोपींशी संगणमत करुन घातक शस्त्राच्या सहाय्याने मृतक व इतर जखमी साक्षीदारांवर अनेक वार व प्रहार केल्याचे दिसुन येते. आरोपी, मृतक व जखमी साक्षीदारांमध्ये घटनेच्यापुर्वी जमिनीवरुन वाद होते. यावरुन आरोपींनी पुर्व नियोजीतपणे अपराधाचे कृत्य केल्याची दाट शक्यता आहे. मृतकाचा मृत्यु हा घटनेच्या ठिकाणी झालेल्या मारहाणीमुळे झाला ही बाब आरोपींनी स्पष्टपणे नाकारलेली नाही. याउलट आरोपींकडुन फिर्यादी, मृतक व जखमी साक्षीदारांविरुध्द दिलेल्या फिर्यादीवरुन मृतक व आरोपी हे घटनेच्या वेळी व ठिकाणी उपस्थित होते व आरोपींनी केलेल्या घातक शस्त्रांच्या मारहाणीमुळे मृतकाचा मृत्यु झाला हया अभियोग पक्षाने केलेल्या आरोपास भक्कम दुजोरा मिळालेला आहे. त्यामुळे आरोपींविरुध्द भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) खालील खुनाचा अपराध निष्पन्न होत नाही हा आरोपींचे विधिज्ञ श्री. ए. आर. शेख यांनी केलेला युक्तिवाद या क्षणाला तरी स्वीकारता येणार नाही.

**१०)** आरोपींच्या वतीने विद्यमान विधिज्ञ श्री. ए. आर. शेख यांनी दुसऱ्यांदा असा युक्तिवाद केला की, सदर गुन्ह्यातील सह आरोपी आरीफाबी व इतर दोन आरोपींना न्यायालयाने जामीनावर मुक्त केले आहे. त्यामुळे समानता हया तत्वाच्या आधारे प्रस्तुत आरोपींना देखील जामिनावर मुक्त करण्यात यावे. विद्यमान विधिज्ञ श्री. ए. आर. शेख यांच्या हया युक्तिवादाच्या अनुषंगाने महत्वाची बाब नमुद करणे जरुरीचे वाटते ती अशी की, सह आरोपी आरीफाबी व इतर दोन हया महिला असल्यामुळे त्यांचे 'स्त्रीत्व' विचारात घेवुन त्यांना जामिनावर मुक्त केले आहे. सदर आरोपी हे पुरुष असल्यामुळे जामिनावर सुटलेल्या

महिला आरोपींच्या जामिनाचे समानतेचे तत्व सदर आरोपीस लागु होत नाही. त्यामुळे सदर आरोपीला समानतेच्या तत्वावनुसार जामिनावर मुक्त करता येणार नाही.

**११)** आरोपींचे विद्यमान विधिज्ञ श्री. ए. आर. शेख यांनी आणखी असा युक्तिवाद केला की, प्रथम खबरी अहवालामध्ये आरोपींकडे कोणते हत्यार अथवा साधन होते याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. आरोपींतर्फे करण्यात आलेल्या सदरहु युक्तिवादाच्या अनुषंगाने असे नमुद करणे जरुरीचे आहे की, प्रथम खबरी अहवालातील घटनेचा तपशिल व पोलीसांच्या तपासाच्या कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसुन येते की, घटनेच्या वेळी व ठिकाणी सदर आरोपी व इतर सह आरोपी एकाच वेळी उपस्थित होते. सर्व आरोपींनी मयत व जखमी साक्षीदारांना लोखंडी रॅाड व काठ्यांनी मारहाण करुन गंभीर दुखापत केल्याच्या वस्तुस्थितीस वैद्यकीय प्रमाणपत्र व प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या जबाबाने दुजोरा मिळालेला आहे. सर्व आरोपींचा घटनेच्या ठिकाणी एकाच वेळी सहभाग व समावेश असल्याचे स्पष्टरितीने निदर्शनास येते. अशा परिस्थितीमध्ये सदर आरोपींची सक्रिय भुमिका होती हे उघड होते. त्यामुळे आरोपी हे निरपराध आहे हा त्यांचा बचावाचा मुद्दा हया टप्प्यावर निर्णयीत केला जावु शकत नाही.

**१२)** पोलीसांच्या प्रस्तुत गुन्हयाच्या संदर्भातील तपासाच्या कागदपत्रावरुन असे दिसुन येते की, सर्व आरोपींनी सामाईक हेतुने घटनेच्या वेळी व ठिकाणी कथीत गुन्हा करण्यासाठी एकमेकांना मदत केली आहे. त्यासंदर्भात सबळ पुरावा अभियोग पक्षाने सादर केलेला आहे. भारतीय न्याय संहिता कलम १०३ (१) अंतर्गत असलेला गुन्हा मृत्युदंड व जन्मठेपेच्या शिक्षेस पात्र असुन सदर गुन्हा हा अजामीन पात्र आहे. जरी आरोपींविरुध्द दोषारोप पत्र दाखल होवुन दोषारोप निश्चित झाला असला तरी गुन्ह्याचे गंभीर स्वरुप विचारात घेता प्रस्तुत खटल्यातील मुळ फिर्यादी व काही महत्वाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचा तोंडी पुरावा पुर्ण होईपावेतो सदर आरोपींना जामिनावर सोडणे न्याय योग्य होणार

नाही. अशा परिस्थितीत आरोपींना जामीन मंजुर करण्याचा न्यायालयाच्या विवेकाधीन असलेला अधिकाराचा आरोपींच्या हक्कात वापर करणे कायदेशीर दृष्ट्या योग्य होणार नाही. मुळ फिर्यादी अथवा काही महत्वाचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार यांचा तोंडी पुरावा नोंदविल्यानंतर आरोपींच्या जामिनाच्या मागणीचा विचार होवु शकेल हया मताशी येवुन पुढील आदेश पारित करण्यात येतो.

**- आदेश -**

**प्रस्तुत जामीन अर्ज ( निशाणी क्र. ३८ ) फेटाळण्यात आला आहे.**

स्वा/-
( राजेंद्र ज. तांबे )
तदर्थ जिल्हा न्यायाधीश - १
व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, मेहकर

दिनांक १३ / ०८ / २०२६

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file Order / Judgment are correct word to word as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Court | : | Shri. Rajendra J. Tambe<br>Additional Sessions Judge,<br>Mehkar, Dist. Buldhana. |
| Name of Steno | : | Sandip Ramdas Nikalje,<br>Stenographer, Grade-3, Mehkar. |

Judgment/Order Signed by P.O. On : 13.08.2026

Judgment/Order uploaded on : 13.08.2026